महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन: यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
संकेतस्थळ: www.mahadiscom.in, ई-मेल: cecommho@gmail.com

क्र.मु.अ.(वा)/शासन/पशुसंवर्धन/कृषी/ No 06003 दिनांक: 16 FEB 2026

# वाणिज्य परिपत्रक क्र. ३५२

**विषय: पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विषयक व्यवसायिक इत्यादीना वीजदरात सवलत देणेकरिता कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.**

संदर्भ: १. शासन निर्णय क्र:पविआ-०३२५/प्र.क्र.७४/पदुम-३,दि.३१.०७.२०२५
२. शासन निर्णय क्र:पविआ-०३२५/प्र.क्र.७४/पदुम-३ दि.२९.१०.२०२५
३.शासन पत्र क्र:संकिर्ण-२०२५/ प्र.क्र.२८८/ऊर्जा-५ दि.११.०२.२०२६

वरील संदर्भिय शासन निर्णय क्र.१ अन्वये राज्यातील पशुधन संख्या (i) २५,००० किंवा त्यापेक्षा कमी मांसल कुक्कुट पक्षी / ५०,००० किंवा त्यापेक्षा कमी अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी, (ii) ४५,००० किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेच्या हॅचरी युनिट, (iii) १०० किंवा त्यापेक्षा कमी दुधाळ जनावरांचा गोठा, (iv) ५०० किंवा त्यापेक्षा कमी मेंढी/शेळी गोठा, (v) २०० किंवा त्यापेक्षा कमी वराह यांना कृषी समकक्ष दर्जा देण्यात येऊन कृषी दराप्रमाणे वीजदर (लघुदाब/उच्चदाब/अतिउच्चदाब) सवलत देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

सदर शासन निर्णयांची राज्यभर प्रभावी, एकसमान व सुलभ अंमलबजावणी होण्यासाठी संदर्भाधीन २ येथील शासन निर्णय तथा संदर्भिय शासन पत्र क्र.३ अन्वये सविस्तर कार्यपद्धती निर्गमित करण्यात आली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**शासन निर्णय:**

१. कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास कृषी व्यवसायास देण्यात येणाऱ्या दराने अनुदान/ सवलत देण्यात येईल.
२. पशुपालन व्यवसायास अंतर्गत पशुधन संख्या (i) २५,००० किंवा त्यापेक्षा कमी मांसल कुक्कुट पक्षी/ ५०,००० किंवा त्यापेक्षा कमी अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी, (ii) ४५,००० किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेच्या हॅचरी युनिट, (iii) १०० किंवा त्यापेक्षा कमी दुधाळ जनावरांचा गोठा, (iv) ५०० किंवा त्यापेक्षा कमी मेंढी/शेळी गोठा, (v) २०० किंवा त्यापेक्षा कमी वराह यांना वीजदरात सवलतीचा लाभ अनुज्ञेय राहील.
३. वीजदरात सवलतीचा लाभ मिळण्याकरिता पशुपालन प्रकल्पांनी संबंधित जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांच्याकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.
४. पशुपालन प्रकल्पांमधील सर्व पशुधनाची एनडीएलएम (भारत पशुधन) पोर्टलवर नोंदणी आवश्यक आहे.

५. पशुपालन प्रकल्पाकरिता स्वतंत्र वीज मीटर असणे आवश्यक आहे. पशुपालन प्रकल्पातील पशुगृह, चारा/पशुखाद्य, पाण्याचे पंप, प्रक्रिया व शितसाखळी राखण्याकरिता आवश्यक यंत्रसामुग्रीकरिता सवलतीच्या दरातील वीजवापर करता येईल.

६. अवसायनातील सहकारी संस्था/ बंद पडलेले पशुपालन प्रकल्प वीजदर सवलतीस पात्र ठरणार नाहीत.

७. सदर योजनेत वीज ग्राहकांचा अनाधिकृत वीजवापर आढळल्यास विद्युत अधिनियम, २००३ कलम १२६ व कलम १३५ च्या अनुषंगाने प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी महावितरण (MSEDCL) कंपनीची राहील.

**वीजदर सवलत वितरीत करण्याची कार्यपध्दती:**

१. कृषी समकक्ष दर्जाच्या अनुषंगाने वीजदर सवलतीस पात्र लार्भाथ्यांचा आवश्यक तो तपशील / यादी सबंधित तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी यांनी सबंधित उपअभियंता महावितरण कंपनी यांना उपलब्ध करुन देतील.

२. वरीलप्रमाणे सबंधित तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी यांच्याकडून प्राप्त यादीची सविस्तरपणे पडताळणी करून सदर प्रकल्पांची महावितरणच्या संगणकीय प्रणालीवर उपलब्ध माहिती जसे की, ग्राहक क्रमांक, ग्राहकाचे नांव, ग्राहकाचा पत्ता, ग्राहकांचा वीज वापर, ग्राहकांचे वीज देयक, वीज दरातील फरकाची परिगणना इ. ची माहिती तयार करण्यात यावी.

३. वरीलप्रमाणे पात्र लाभार्थ्यांची अद्ययावत माहिती तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी यांना संबंधित उपअभियंता महावितरण कंपनी यांनी उपलब्ध करुन देण्यात यावी.

४. वीजदर सवलतीसाठी अर्जदारांची पात्रता निश्चिती तसेच विजदर सवलती संदर्भातील येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी,

    i. उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) कार्यालय संबधित जिल्हा व कार्यकारी अभियंता (प्रशासन) मंडल कार्यालय महावितरण हे जिल्हास्तरावर समन्वयाचे काम पाहतील.

    ii. त्याचप्रमाणे सहायक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) व अतिरिक्त कार्यकारी अभियंता / उप कार्यकारी अभियंता, महावितरण हे तालुका स्तरावर समन्वय म्हणून काम पाहतील.

५. सर्व जिल्ह्यांमधील पात्र लाभार्थ्यांची माहिती व त्यासाठी लागणारा निधी याची माहिती एकत्रितपणे संकलित करून आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) कार्यालय, पुणे यांच्याकडून मुख्य अभियंता (वाणिज्य) मुख्य कार्यालय, मुंबई यांना पाठविल्या नंतर मुख्य अभियंता (वाणिज्य) महावितरण कार्यालयाकडून अग्रीम निधीची अंदाजित मागणी शासनास सादर करण्यात येईल.

६. शासन निर्णयात नमुद केल्यानुसार विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६५ नुसार वरीलप्रमाणे मागणी करण्यात आलेली रक्कम अर्थसंकल्पित करून आगाऊ अर्थसहाय्याच्या स्वरूपात वितरीत केल्यानंतर सदर योजनेचा लाभ ग्राहकांस देण्यात येईल.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**
**महावितरण**

**प्रत सविनय सादर:**

मा. आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) कार्यालय, पुणे.

- उपअभियंता यांना देण्यात येणाऱ्या लाभार्थ्यांच्या यादीची एक प्रत मुख्य कार्यालास cecommho@gmail.com या इमेलवर सादर करावी हि विनंती.

**प्रत रवाना:**

सह सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

पशुसंवर्धन व्यवसायास “कृषि समकक्ष दर्जा” देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: पविआ-०३२५/प्र.क्र.७४/पदुम-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार,मुंबई- ४०००३२
दिनांक : ३१ जुलै, २०२५

वाचा :-
१. शासन परिपत्रक दिनांक संकिर्ण१०८७/२२३०१/सीआर-२०२/पदुम-४, दिनांक ०६.०७.१९८९
२. आयुक्त पशुसंवर्धन यांचे जा.क्र. पशुधन-१/प्र.क्र. ६९५/२७८१ /२०२५, पंस-१३, दिनांक १०.०३.२०२५
3. आयुक्त पशुसंवर्धन यांचे जा.क्र. पशुधन-१/प्र.क्र. ६९५/४९२५ /२०२५, पंस-१३, दिनांक ११.०४.२०२५

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर पर्यंत पोहोचविण्यासाठी पथदर्शी आराखडा अहवाल शासनास सादर केला आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने जे घटक उत्पन्न वाढीस चालना देऊ शकतील, असे ८ घटक सुनिश्चित केले आहेत. यामध्ये “कृषि व संलग्न” या घटकाचा समावेश आहे. सद्यस्थितीत राज्याच्या सकल उत्पन्नात कृषि क्षेत्राचा वाटा १२ टक्के इतका असून कृषि क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के इतका आहे.

निती आयोगाने सन २०२१ च्या अहवालात पशुसंवर्धन व्यवसायापासून देशाच्या /राज्याच्या सकल उत्पादनात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याची शिफारस केली आहे.

पशुपालकांना भेडसावणाऱ्या कृषि वीज दराच्या तुलनेत जास्त वीज दर, सौर उर्जेसाठी अनुदानाचा अभाव, ग्रामपंचायत कर, शेती कर्जाच्या व्याज दराच्या तुलनेत अधिक व्याज दराची आकारणी या अडचणींचे निराकरण झाल्यास पशुपालन व्यवसायाकडे लोकांचा कल वाढून पशुजन्य उत्पादनात वाढ होईल. व्यावसायिक नफ्यात वाढ तसेच स्पर्धात्मक वातावरण यामुळे पशुजन्य उत्पादित बाबीस मुल्यवर्धन साखळीची निर्मिती, शेती प्रमाणे गट पद्धतीने पशुसंवर्धन, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब यासारख्या बाबीमध्ये आपोआप वाढ (resultant increase) होईल. यासाठी पशुपालक व्यवसायास प्रोत्साहन देताना कृषि व्यवसायाप्रमाणे सवलती देणे आवश्यक असल्याने पशुपालन व्यवसायास “कृषि समकक्ष दर्जा” देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुसार मा. मंत्रिमंडळाने दि १०.०७..२०२५ रोजी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.:-

**शासन निर्णय:-**

राज्यामध्ये २० व्या पशुगणनेनुसार गायवर्गीय पशुधन १,३९,९२,३०४ व म्हैसवर्गीय पशुधन ५६,०३,६९२ असे एकूण १,९५,९५,००० इतके पशुधन आहे. राज्यात पशुपालन व्यवसायापासुन सुमारे ६० लक्ष कुटुंबे अर्थाजन करित आहे. पशुपालकांच्या उत्पन्नात वाढ होण्याबरोबरच राज्याच्या सकल उत्पन्नात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टिकोनातून पशुपालकांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच स्थानिक रोजगार निर्मिती व्हावी, यासाठी पशुसंवर्धन व्यवसायास "कृषि समकक्ष दर्जा" देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सर्वसाधारणपणे १०,००० मांसल पक्षी व २५,००० अंड्यावरील पक्षी क्षमता असलेल्या कुक्कुट उद्योगाला लघु, तर २५,००० मांसल कुक्कुट पक्षी व ५०,००० अंडयावरील पक्षी क्षमता असलेल्या कुक्कुट उद्योगाला मध्यम स्वरुपाचा व्यवसाय समजण्यात येते. तसेच ५० दुधाळ जनावरांचा गोठा, २०० शेळी-मेंढी गोठा, १०० पर्यंतच्या वराह पालन व्यवसाय यास लघु स्वरुपाचा व्यवसाय समजण्यात येते. तर १०० दुधाळ जनावरांचा गोठा, ५०० शेळी/मेंढी गोठा आणि २०० पेक्षा जास्त वराह पालन करणे यांस मध्यम स्वरुपाचा व्यवसाय समजण्यात येते. लघु व मध्यम स्वरुपाचा व्यवसाय करणाऱ्या कुटुबांची संख्या विचारात घेता, जास्तीत जास्त पशुपालकांना फायदा होऊन पशुपालन व्यवसायाकडे इतर लोकांनी आकृष्ट व्हावे, याद्दष्टीने खालील प्रकल्प क्षमतेच्या पशुपालक कृषि समकक्ष दर्जाच्या अनुषंगाने अनुज्ञेय ठरणाऱ्या लाभास पात्र ठरतील.

१. २५,००० पर्यत मांसल कुक्कुट पक्षी / ५०,००० पर्यत अंडयावरील कुक्कुट पक्षी क्षमता.
२. ४५,००० पर्यत क्षमतेच्या हॅचरी युनिट.
३. १०० पर्यत दुधाळ जनावरांचा गोठा .
४. ५०० पर्यत मेंढी /शेळी गोठा.
५. २०० पर्यत वराह.

**ब्रिडर कुक्कुटपालन व्यवसाय व पशुजन्य उत्पादनावरील प्रक्रिया उद्योगांना** कृषि समकक्ष दर्जाच्या अनुषंगाने अनुज्ञेय ठरणारे लाभ अनुज्ञेय नाही.

पशुसंवर्धन व्यवसायास कृषि समकक्ष दर्जाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे लाभ अनुज्ञेय राहतील.:-

१. २५,००० पर्यत मांसल कुक्कुट पक्षी / ५०,००० पर्यत अंडयावरील कुक्कुट पक्षी क्षमतेच्या तसेच ४५,००० पर्यत क्षमतेच्या हॅचरी युनिटच्या कुक्कुटपालन व्यवसाय, १०० पर्यत दुधाळ जनावरे संगोपन, ५०० पर्यत मेंढी /शेळी पालन व २०० पर्यत वराह या पशुसंवर्धन विषयक व्यवसायासाठी वीज दर आकारणी "कृषी इतर" या वर्गवारीनुसार न करता "कृषि" वर्गवारीप्रमाणे वीज आकारणी करण्यात येईल.
२. कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सौरउर्जा पंप व इतर सौरउर्जा संच उभारण्यास कृषि व्यवसायास देण्यात येणाऱ्या दराने अनुदान /सवलत देण्यात येईल.
३. पशुपालन व्यवसायास स्वतंत्र व्यवसाय न समजता शेती व्यवसाय समजून कृषि व्यवसायास ज्या दराने ग्रामपंचायत कर आकारणी केली जाते त्याच दराने व राज्यभरात समान दराने ग्रामपंचायत कर आकारणी करण्यात येईल .

४. पशुपालन व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या खेळत्या भागभांडवलासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जासाठी "पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना" च्या धर्तीवर व इतर प्रयोजनासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याज दरात ४ % पर्यंत सवलत देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी स्वयंस्पष्ट मार्गदर्शक तत्वे व कार्यपध्दती वेगळयाने विहित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय नियोजन विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. २१५/कार्यासन १४३१ दि. २३/५/२०२५ व वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्र.३२१/व्यय-२ दिनांक ८/७/२०२५ अन्वये दिलेल्या अभिप्रायास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेताक २०२५०७३१११५७१६२९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NIWRUTTI BHAGUJI MARALE

Digitally signed by NIWRUTTI BHAGUJI MARALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=8a75c414ff50ce35220c63cd53d2eb1a99a474c02300beea74bb051c4c3c90a9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=NIWRUTTI BHAGUJI MARALE
Date: 2025.07.31 11:58:06 +05'30'

**(नि. भा. मराळे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत -**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) (वित्त व नियोजन )यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
५. प्रधान सचिव /अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव /अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव /अप्पर मुख्य सचिव, कृषि व पदुम विभाग (कृषि), मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव /अप्पर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव /अप्पर मुख्य सचिव, उद्योग उर्जा व कामगार विभाग (उर्जा), मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव /अप्पर मुख्य सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव /अप्पर मुख्य सचिव, अपारंपारीक उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धवयवसाय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१४. मा. मंत्री (पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१५. मा. मंत्री (दुग्धव्यवसाय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१६. सर्व सहआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय)
१७. सर्व जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय)
१८. सर्व कार्यासने कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई
१९. निवड नस्ती-३

पशुसंवर्धन व्यवसायास " कृषि समकक्ष दर्जा" लागू करण्याबाबत
पशुपालन व्यवसायासाठी लागणाऱ्या वीजेच्या दराची आकारणी "कृषि इतर" या वर्गवारी न करता "कृषि" या वर्गवारी प्रमाणे करण्यासाठी कार्यपध्दती विहीत करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पविआ- ०३२५/प्र.क्र.७४/पदुम-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई ४०००३२
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२५

वाचा- १. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. पविआ- ०३२५/ प्र.क्र.७४/पदुम-३,दि. ३१.०७.२०२५.
२. शासन परिपत्रक क्र. संकिर्ण - १०८७/२२३०१/सीआर-२०२/पदुम-४, दि.०६.०७.१९८९

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर पर्यंत पोहोचविण्यासाठी सादर केलेल्या पथदर्शी आराखडयानुसार सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने जे घटक उत्पन्न वाढीस चालना देऊ शकतील, असे ८ घटक सुनिश्चित केले असून त्यामध्ये "कृषी व संलग्न"या घटकाचा समावेश आहे. तसेच, निती आयोगाने सन २०२१ च्या अहवालात पशुसंवर्धन व्यवसायापासून देशाच्या/ राज्याच्य सकल उत्पादनात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याची शिफारस केली आहे.

२. पशुपालकांना भेडसावणाऱ्या कृषी वीज दराच्या तुलनेत जास्त वीज दर, सोलर एनर्जीसाठी अनुदानाचा अभाव, ग्रामपंचायत कर,शेती कर्जाच्या व्याज दराच्या तुलनेत अधिक व्याज दराची आकारणी या अडचणींचे निराकरण झाल्यास पशुपालन व्यवसायाकडे लोकांचा कल वाढून पशुजन्य उत्पादनात वाढ होईल. व्यावसायिक नफ्यात वाढ तसेच स्पर्धात्मक वातावरण यामुळे पशुजन्य उत्पादित बाबींस मुल्यवर्धन साखळीची निर्मिती, शेती प्रमाणे गट पध्दतीने पशुसंवर्धन, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब यासारख्या बाबीमध्ये आपोआप वाढ होईल. ही बाब विचारात घेऊन वाचा क्र. १ येथील शासन निर्णयान्वये पशुसंवर्धन व्यवसायास "कृषी समकक्ष दर्जा" देण्याचा निर्णय मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने घेण्यात आला आहे.

३. वरील निर्णयाचा लाभ लघु व मध्यम स्वरुपाचा व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांना खालील प्रमाणे लाभ अनुज्ञेय राहतील.:-

i. पशुसंवर्धन विषयक व्यवसायासाठी वीज दर आकारणी "कृषी इतर" या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे वीज आकारणी करण्यात येईल.
ii. कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास कृषी व्यवसायास देण्यात येणाऱ्या दराने अनुदान / सवलत देण्यात येईल.

iii. पशुपालन व्यवसायास स्वतंत्र व्यवसाय न समजता शेती व्यवसाय समजून कृषी व्यवसायास ज्या दराने ग्रामपंचायत कर आकारणी केली जाते त्याच दराने व राज्यभरात समान दराने ग्रामपंचायत कर आकारणी करण्यात येईल.

iv. कृषी प्रमाणे पशुपालन व्यवसायास कर्जावरील व्याज दरात सवलत देण्यात येईल.

४. पशुपालन व्यवसायास "कृषी समकक्ष दर्जा" लागू करण्यात आल्याने वरील लाभांपैकी" वीजदरात सवलत लागू करण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-**

५. पशुपालन व्यवसायास "कृषी समकक्ष दर्जा"लागू करण्यात आल्याने वीजदरात सवलतीचा लाभ खालील अटी पूर्ण करणाऱ्या पशुपालकांना देय राहील.

a) पशुधन संख्या

I. २५,००० किंवा त्यापेक्षा कमी मांसल कुक्कुट पक्षी / ५०,००० किंवा त्यापेक्षा कमी अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी

II. ४५,००० किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेच्या हॅचरी युनिट

III. १०० किंवा त्यापेक्षा कमी दुधाळ जनावरांचा गोठा

IV. ५०० किंवा त्यापेक्षा कमी मेंढी /शेळी गोठा

V. २०० किंवा त्यापेक्षा कमी वराह

b) वीजदरात सवलतीचा लाभ मिळण्याकरिता पशुपालन प्रकल्पांनी संबंधित जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय ) यांच्याकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.

c) पशुपालन प्रकल्पांमधील सर्व पशुधनाची एनडीएलएम (भारत पशुधन) पोर्टलवर नोंदणी आवश्यक आहे.

d) पशुपालन प्रकल्पाकरिता स्वतंत्र वीज मीटर असणे आवश्यक आहे. पशुपालन प्रकल्पातील पशुगृह, चारा/पशुखाद्य, पाण्याचे पंप, प्रक्रिया व शितसाखळी राखण्याकरिता आवश्यक यंत्रसामुग्रीकरिता सवलतीच्या दरातील वीजवापर करता येईल.

e) अवसायनातील सहकारी संस्था/ बंद पडलेले पशुपालन प्रकल्प वीजदर सवलतीस पात्र ठरणार नाहीत.

६. वीजदर सवलत लागू करण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबण्यात येईल :-

a) "कृषि समकक्ष दर्जा"च्या अनुषंगाने सध्या कार्यरत असलेल्या/ अस्तित्वात असलेल्या वीजदर सवलतीस पात्र लाभार्थ्यांचा आवश्यक तो तपशील संबंधित तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी यांनी संबंधित उपअभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी-महावितरण (MSEDCL) यांना उपलब्ध करुन दयावा.

b) नवीन पशुपालक लाभार्थ्यांनी वीज मीटर जोडणीसाठी संबंधित, उपअभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी-महावितरण (MSEDCL) यांच्याकडे ऑनलाईन/ ऑफलाईन पध्दतीने विहित स्वरुपात अर्ज सादर करावा.सादर केलेल्या अर्जाची प्रत सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), तालुका पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी कार्यालय यांना देण्यात यावी.

c) सदर योजनेच्या निकषाप्रमाणे तसेच, त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलास अनुसरुन आवश्यक त्या बाबींची पूर्तता करणे लाभार्थ्यास बंधनकारक असेल.

d) वीजदर सवलती संदर्भातील येणाऱ्या तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) व अतिरिक्त कार्यकारी अभियंता /उप कार्यकारी अभियंता उप विभाग महावितरण हे तालुका स्तरावर तसेच संबंधित जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) कार्यालय व कार्यकारी अभियंता (प्रशासन) मंडल कार्यालय महावितरण हे जिल्हास्तरावर समन्वयाचे काम पाहतील.

e) महावितरण कंपनीने पात्र लाभार्थ्यास वीजदरात सवलत देण्यासाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी व त्याचा स्वतंत्र तपशील ठेवावा. सर्व जिल्हयातील पात्र लाभार्थ्यांची माहिती व त्यासाठी लागणारा निधी याची माहिती एकत्रितपणे संकलित करून आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय) कार्यालय पुणे यांच्याकडून मुख्य अभियंता (वाणिज्य) मुख्य कार्यालय, मुंबई यांना पाठविण्यात यावी. त्यानंतर मुख्य अभियंता (वाणिज्य) महावितरण कार्यालयाकडून अग्रीम निधीची मागणी ऊर्जा विभागास करण्यात येईल.

f) सदर योजनेत वीज ग्राहकांचा अनाधिकृत वीजवापर आढळल्यास विद्युत अधिनियम, २००३ कलम १२६ व कलम १३५ च्या अनुषंगाने प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी महावितरण (MSEDCL) कंपनीची राहील.

g) विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम ६५ अनुसार वीजदरात सवलत द्यावयाची झाल्यास त्याची भरपाई वीज वितरण कंपनीस आगाऊ अर्थसहाय्याच्या स्वरुपात करणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त योजनेतंर्गत वीजदरात सवलत देण्यासाठी होणारा अंदाजित खर्च निश्चित करुन महावितरण कंपनीने अगोदरच्या तिमाहीत अग्रीम अर्थसहाय्याची मागणी ऊर्जा विभागाकडे करावी. सदरची मागणी तपासून अर्थसहाय्याच्या निधीवाटपाचे आदेश ऊर्जा विभागाकडून काढण्यात येतील.

h) सदर योजनेत देण्यात येणाऱ्या वीजदर सवलतीची प्रतिपुर्ती महावितरण कंपनीस करण्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्याची व सदर उद्देशासाठी आवश्यक तो निधी अर्थसंकल्पित करण्याची कार्यवाही ऊर्जा विभागाने करावी.

७. सदरचा शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक ०१/१०/२०२५ व दिनांक १४/१०/२०२५ च्या टिप्पणीन्वये दिलेली मान्यता, तसेच नियोजन विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. ३९०/२०२५, दिनांक १६/१०/२०२५ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५५९/२०२५, दिनांक २८/१०/२०२५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१०२९१८४८५७८५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MARALE NIWRUTTI BHAGUJI

Digitally signed by MARALE NIWRUTTI BHAGUJI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept,
2.5.4.20=8A75C414FF50CE35220C63CD53D2EB1A99A474C02300BEEA74BB051C4C3C90A9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=5C891DA87D2A4842558454524CC114BA5B2F67A2A80796592830D345500F15CC, cn=MARALE NIWRUTTI BHAGUJI
Date: 2025.10.29 18:50:31 +05'30'

( नि. भा. मराळे )

**उप सचिव , महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (पशुसंवर्धन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव /अप्पर मुख्य सचिव, कृषि व पदुम विभाग (कृषि), मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव /अप्पर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव /अप्पर मुख्य सचिव, उद्योग उर्जा व कामगार विभाग (उर्जा), मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव /अप्पर मुख्य सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव /अप्पर मुख्य सचिव, अपारंपारीक उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव /अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव /अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र ½ , मुंबई / नागपूर.
१४. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन.
१५. सर्व जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धविकास उपायुक्त.
१६. अवर सचिव-पदुम-४,व कक्ष अधिकारी-पदुम -१,२,१६, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई
१७. निवड नस्ती-३

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्र.०२२-२२८८३४११
ईमेल : narayan.karad@nic.in

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

| क्र: संकिर्ण-२०२५ /प्र.क्र.२८८/ऊर्जा-५ | दिनांक : ११ फेब्रुवारी,२०२६ |
|---|---|

प्रति,

अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,
महावितरण कंपनी मर्या., प्रकाशगड,
वांद्रे (पूर्व), मुंबई-५१

विषय: -मत्स्यव्यवसाय तसेच पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याबाबत व त्याप्रमाणे वीजदर सवलत अंमलबजावणीसाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना निर्गमित करण्याबाबत .

संदर्भ:- १.मत्सवि २०२३/प्र.क्र.०६ /पदुम-१३, दि. ०९ .०५.२०२५
२.मत्सवि २०२३/प्र.क्र.०६ भाग-२/पदुम-१३, दि.१४ .१०.२०२५
३.पविआ-०३२५/प्र.क्र.७४/पदुम-३, दि. ३१.०७.२०२५
४. पविआ-०३२५/प्र.क्र.७४/पदुम-३, दि. २९.१०.२०२५

महोदय,

वरील संदर्भाधीन १ व २ शासन निर्णयांन्वये मत्स्यव्यवसाय क्षेत्रास (प्रकिया उद्योग वगळून) तसेच पशुसंवर्धन व्यवसाय क्षेत्रास कृषी समकक्ष दर्जा देण्यात आलेला असून पात्र प्रकल्पांना कृषी दराप्रमपाणे वीजदर सवलत देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

२. सदर शासन निर्णयांची राज्यभर प्रभावी, एकसमान व सुलभ अंमलबजावणी होण्यासाठी संदर्भाधीन ३ व ४ येथील शासन निर्णयान्वये सविस्तर कार्यपद्धती निर्गमित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने महावितरण कंपनीने सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना (कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंता/शाखा अधिकारी इ.) कार्यपद्धतीबाबत आवश्यक त्या स्पष्ट सूचना निर्गमित कराव्यात. या मध्ये विशेषत: पुढिल बाबींचा समावेश असावा.

१.कृषी समकक्ष दर्जाच्या अनुषंगाने वीजदर सवलतीस पात्र लाभार्थ्यांचा आवश्यक तो तपशील सबंधित तालुका पशुसंर्वधन व दुग्धव्यवसाय अधिकारी तसेच सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी सबंधित उपअभियंता महावितरण कंपनी यांना उपलब्ध करुन देतील.

२.वीजदर सवलतीसाठी सबंधित विभागाकडून पात्र झालेल्या प्रकल्पांमधील ,ग्राहकांची संख्या/ग्राहक क्रमांक, ग्राहकांचा वार्षिक वीज वापर, ग्राहकांचे वीज देयक, वीज दरातील

फरकाची परिगणना इ. माहिती तालुका (पशुसंर्वधन व दुग्धव्यवसाय) अधिकारी तसेच सहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) यांना उपलब्ध करुन देतील.

३. वीजदर सवलती संदर्भातील येणाऱ्या तांत्रिक अडचणी क्षेत्रीय स्तरावर सोडविण्यात याव्यात.

४. सर्व जिल्ह्यांमधील पात्र लाभार्थ्यांची माहिती व त्यासाठी लागणारा निधी याची माहिती एकत्रितपणे संकलित करून आयुक्त ( मत्स्यव्यवसाय ),मुंबई तसेच आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) कार्यालय, पुणे यांच्याकडून मुख्य अभियंता (वाणिज्य) मुख्य कार्यालय, मुंबई यांना पाठविण्यात येईल. त्यानंतर मुख्य अभियंता (वाणिज्य) महावितरण कार्यालयाकडून अग्रीम निधीची मागणी ऊर्जा विभागास करण्यात यावी. महावितरण कंपनीने पात्र लाभार्थ्यांस वीजदरात सवलत देण्यासाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी व त्याचा स्वतंत्र तपशील ठेवावा.

५. सदर वीजदरात सवलत देण्याप्रित्यर्थ होणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यासाठी ऊर्जा विभागाकडून महावितरण कंपनीस अर्थसहाय्य देण्यात येईल. त्याकरिता मुख्य अभियंता (वाणिज्य) महावितरण कार्यालयाकडून अग्रीम निधीची मागणी ऊर्जा विभागास करावी.

६. सदर सूचना निर्गमित करताना शासन निर्णयातील सर्व तरुतुदींचे काटेकोर पालन करण्यात यावी. वरीलप्रमाणे निर्गमित करण्यात येणाऱ्या सूचना महावितरणच्या सर्व संबधित कार्यालयांना तात्काळ परिपत्रकाद्वारे कळविण्यात याव्यात,जेणेकरुन पात्र मत्स्यव्यवसाय व पशुसंवर्धन व्ययवसाय लाभार्थ्यांना वीजदर सवलतीचा लाभ विनाविलंब व सुलभरीत्या मिळू शकेल.

सहपत्र:वरिलप्रमाणे

आपला,

(ना.श्री.कराड)

सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत:

१. उप सचिव (मत्स्यव्यवसाय व पशुसंवर्धन), पदुम-१३ विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.
२. उप सचिव (मत्स्यव्यवसाय व पशुसंवर्धन), पदुम-३ विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.